# ePaper देवेंद्र फडणवीसांची शिंदेंसोबत आधीच झाली होती बोलणी!



| वर्ष - 6 । अंक - 79 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- बंडखोर शिवसेना आमदार, कॉंग्रेस ठरवताहेत अजितदादांना ‘व्हिलन’
- पाऊले चालती पंढरीची वाट...
- एकनाथ शिंदेंच्या बंडामागे भाजपाचा हात?

www.mahaenews.com | ।शुक्रवार । दिनांक 24 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"शिवसेनेच्या इतिहासात एकनाथ शिंदे यांनी केलेलं हे तिसरं बंड आहे. नारायण राणे, छगन भुजबळ आणि आता एकनाथ शिंदे यांनी बंडाचं निशाण फडकावलंय. राज ठाकरे यांनी बंड केलं असं म्हणता येणार नाही. तो त्यांचा घरातील मामला होता. पण आमदारांनी बंड केल्यास कार्यकर्ते त्यांच्यामागे जात नाहीत. शिवसैनिक मात्र कायम नेतृत्वाच्या पाठीमागे उभे राहतात. बंडखोरांना पराभूत करण्यासाठी शिवसैनिक जीवाचं रान करतात.

- **अजित पवार**, उपमुख्यमंत्री

उध्दव ठाकरेंनी माझ्या विरोधकाला म्हणजे राणा जगजीतसिंह पाटील यांना केवळ माझ्यामुळे शिवसेना पक्षात घेतले नाही. विधानसभा निवडणुकीवेळी उस्मानाबादची जागा शिवसेनेकडे होती. त्यावेळी राणा पाटील यांनी शिवसेनेच्या तिकिटावर लढवण्याची तयारी दाखवली. मात्र माझा संघर्ष त्यांनी बघितलेला असल्याने त्यांनी राणा पाटलांना तिकिट नाकारले.

- **ओमराजे निंबाळकर**, खासदार



## शॉर्ट न्यूज »

### पालखी सोहळ्यासाठी प्रथमच ‘कॅराव्हॅन’चा वापर

**।पुणे।** पालखी सोहळ्यासाठी पुणे जिल्ह्याच्या हद्दीत ‘प्रशासन ऑन व्हील’ ही संकल्पना राबविण्यात येत आहे. त्यानुसार पर्यटन विभागाच्या ‘कॅराव्हॅन’चा वापर करण्यात येत आहे. यात दहा अधिकारी नियुक्त करण्यात आले असून त्याद्वारे वारीचे नियोजन व समन्वय करण्यात येत आहे. पालखी सोहळ्यात वारीच्या नियोजन आणि समन्वयासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज संस्थानांचे कार्यालय मोबाइल अर्थात व्हॅनवर तसेच इतर गाडय़ांमध्ये असते. त्यामुळे आकस्मिक परिस्थिती, इतर विभागांसोबत नियोजन करणे सोयीचे होते. त्यानुसार जिल्हा प्रशासनालाही सोयीचे व्हावे, यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी एक फिरते कार्यालय असावे, अशी संकल्पना मांडली.

## महापालिका निवडणुकीचा अंतिम टप्पा पूर्ण

# पिंपरी पालिकेची प्रभागनिहाय मतदार यादी जाहीर!

## पिंपरी-चिंचवडमध्ये पाच वर्षात तीन लाख मतदार वाढले

**।पिंपरी।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेची २०२२ची सार्वत्रिक निवडणूक कधी होणार हे नक्की नाही. ती पावसाळ्यांनंतर होईल असा अंदाज आहे. तरीही त्यासाठीची सर्व तयारी प्रशासनाने आताच केली आहे. या तयारीचा शेवटचा भाग व टप्पा म्हणून प्रभागनिहाय मतदारयादी पालिका आय़ुक्त तथा प्रशासक राजेश पाटील (Rajesh Patil) यांनी आज जाहीर केली. पण, त्यात चुका असतील, अशी शंका प्रशासनानेच लगेच व्यक्त केली. त्यामुळे ती बिनचूक होण्यासाठी त्यांनी १ जुलैपर्यंत त्यावर मतदारांच्या हरकती व सुचना मागवल्या आहेत.



### भोसरीत सर्वाधिक मतदार नोंदणी...

शहरात चिंचवड, भोसरी आणि पिंपरी असे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. चिंचवड हा सर्वाधिक मोठा आहे. मात्र नवीन मतदारनोंदणी ही अधिक भोसरीत (२७,२५२) झाली आहे. तर, पिंपरीत ती सर्वात कमी (६,६६८) नोंदवली गेली आहे. २०१७ पेक्षा यावेळच्या (२०२२) मतदारयादीत तीन लाख नव्या मतदारांची भर पडल्याने ही एकूण संख्या १५ लाख ६९३ वर गेली आहे. त्यात आठ लाख ३९४ पुरुष, सहा लाख ८७ हजार ६४७ महिला, तर ८८ इतर मतदार आहेत. गतवेळी चार सदस्यांचे ३२ प्रभाग होते. यावेळी तीनसदस्यीय पद्धतीने ही निवडणूक होणार असल्याने ही संख्या ४६ वर गेली आहे. त्यातील ३८ नंबरचा प्रभाग हा सर्वात मोठा असून तेथे ५२,६४८ मतदार आहेत. तर, सर्वात लहान प्रभाग हा ३८ चा शेजारी ३७ हा आहे. तेथील मतदारांची संख्या २१,१०२ आहे.

दरम्यान, २०१७ च्या पिंपरी पालिका निवडणुकीपेक्षा यावेळच्या निवडणुकीतील मतदारांची संख्या तीन लाखांनी वाढली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार १ मे २०२२ पर्यंतची विधानसभा मतदारयादी ग्राह्य धरू ही प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादी आज प्रसिद्ध करण्यात आली. मात्र विधानसभा मतदारयादीत नाव असूनही ते प्रभागयादीत नसणे, प्रभाग बदलणे अशा चुका राहिल्या असण्याची शक्यता प्रशासनानेच लगेच व्यक्त केली. म्हणून ही यादी बिनचूक होण्याकरिता १ जुलैपर्यंत त्यावर हरकती व सुचना मागविण्यात आल्या आहेत. त्या प्रत्यक्ष मतदारांनीच करायच्या असल्याचे पालिकेचे निवडणूक कक्ष प्रमुख तथा सहाय्यक आयुक्त बाळासाहेब खांडेकर यांनी सांगितले. हे काम करताना नव्याने मतदाराचे नाव मतदारयादीत टाकले जाणार नाही वा ते वगळणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# मुख्यमंत्र्यांच्या बैठकीला उपस्थिती लावत खासदार श्रीरंग बारणेंनी जपली ठाकरेनिष्ठा!

## शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे पक्ष आणि पक्षप्रमुखांसोबतच

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

शिवसेनेचे बंडखोर नेते व राज्याचे नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गोटात पक्षाच्या ५५ पैकी ४१ आमदारांनी आजपर्यंत हजेरी लावली आहे. त्यानंतर काही खासदारांनीही त्यांना समर्थन दिले आहे. त्यातूनच त्यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासह पक्षाच्या १८ पैकी पाच खासदार हे पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या `वर्षा`वरील बैठकीला हजर नव्हते. दरम्यान, पिंपरी-चिंचवडचे प्रतिनिधीत्व करणारे शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी, मात्र आपण पक्ष आणि पक्षप्रमुखांसोबतच असल्याचे स्पष्ट केले. हीच भूमिका शिवसेनेचे



पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख अॅड. सचिन भोसले यांनी मांडली. शहरातील सर्व शिवसैनिक हे शिवसेना आणि उद्धव ठाकरेंसोबत असल्याचा दावा त्यांनी केला. गत टर्मला शहरात तीनपैकी शिवसेनेचे अॅड. गौतम चाबूकस्वार हे एकच आमदार होते. यावेळी ते नाहीत, त्यामुळे मुंबईसह राज्य व देशभरातही शिवसेनेत चाललेल्या मोठ्या घडामोडी व उलथापालथीचे लगेच मोठे परिणाम पिंपरी-चिंचवडमध्ये दिसून आलेले नाहीत. त्याबाबत स्वतःहून कुठलाही स्थानिक नेता आपण कुणाच्या बाजूने आहे, हे सांगत नाही. व्यक्त होत नाही, असे सध्या शिवसेनेत चित्र आहे.

पक्षातील बंडाविषयी अॅड. चाबूकस्वार यांना विचारले असता आमदार गेले म्हणजे शिवसैनिक गेला असे होत नाही. पक्ष संपला असे होत नाही. उलट आता जिद्दीने पेटलो असल्याने पुन्हा उभारी घेऊ, असे ते म्हणाले. तसेच, पक्ष आणि उद्धव ठाकरेंसोबतच आपण आहे, हेही त्यांनी स्पष्ट केले. हे एक वादळ आहे. ते लवकरच शांत होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. तसेच, बंड हे शिवसेनेला नवीन नाही, फक्त ते या वेळी मोठे आहे, असेही ते म्हणाले.

## शॉर्ट न्यूज »

### शीतपेयाचे पैसे मागितले म्हणून हॉटेल व्यवस्थापकालाच मारहाण

। पुणे । महाईन्यूज ।

लोहगाव परिसरातील मराठा दरबार हॉटेलमध्ये शीतपेय आणि पाण्याची बाटली घेतल्यानंतर त्याचे पैसे मागितले म्हणून चौघांच्या टोळक्याने हॉटेलच्या व्यवस्थापकालाच बेदम मारहाण केली. यात व्यवस्थापक जखमी झाला आहे. पोलिसांनी चार अज्ञात आरोपींवर गुरुवारी गुन्हा दाखल केला.

याबाबत हॉटेल मराठा दरबारचे व्यवस्थापक संतोष राघेंद्र शेट्टी (वय ४२, रा. वाघोली, पुणे) यांनी तक्रार दाखल दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेट्टी हे हॉटेल व्यवस्थापक म्हणून उपस्थित असताना चार अनोळखी ग्राहक हॉटेलमध्ये आले. त्यांनी

### अजितदादांकडून काँग्रेस आमदारांना त्रास झाल्याचा नाना पटोले यांचा आरोप

# बंडखोर शिवसेना आमदार, काँग्रेस ठरवताहेत अजितदादांना 'व्हिलन'

### महाविकास आघाडी सरकारमधील दोन घटकांनी अजित पवार यांना दोष द्यायला सुरवात केली आहे.

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी

काँग्रेस, राष्ट्रवादीसोबतची आघाडी नैसर्गिक नाही. या सरकारमधून बाहेर पडले पाहिजे, अशी भूमिका मांडणाऱ्या बंडखोर शिवसेना आमदारांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे शिवसेनेचे नुकसान होत असल्याची भावना व्यक्त केली होती. त्यात पद्धतीने उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडून काँग्रेस आमदारांना त्रास झाल्याचा आरोप प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. सरकार पडण्याची स्थिती आली असताना या साऱ्याला अजित पवार यांना जबाबदार धरून त्यांना 'व्हिलन' बनविण्यात येत असल्याचे सध्याचे चित्र आहे.

राष्ट्रवादी आणि काँग्रेस या दोन पक्षामुळे शिवसेनेचे मोठे नुकसान होत आहे. मुळात त्यांच्याबरोबरची



आघाडी अनैसर्गिक आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मुळे शिवसेना आमदारांना काम करताना अडचणी येत आहेत. शिवसेनेच्या आमदारांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून दुय्यम वागणूक मिळत होती, असा आरोप एकनाथ शिंदे आणि त्यांच्या समर्थक आमदारांकडून यापूर्वीच करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ही अजित पवार यांच्यामुळे काँग्रेसचे आमदारांना त्रास होत होता. कामात अडचणी येत होत्या असा आरोप केला आहे.

महाविकास आघाडी सरकारमधील दोन घटकांनी अजित पवार यांना दोष द्यायला सुरवात केली आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यभर विस्तार करण्यास प्राधान्य देण्यात येत होते. प्रत्येक मतदारसंघात आपल्या पक्षाची ताकद कशी वाढेल यावर अजित पवार यांचा भर होता. आमदारकीच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या पराभूत झालेल्या उमेदवाराचे काम ते तातडीने मार्गी लावत. या उलट याच मतदारसंघातील शिवसेनेच्या अथवा काँग्रेसच्या आमदाराचे काम अशा गतीने होत नाहीत हा या साऱ्या आरोपांमागील सूर आहे.

या सरकारचा सर्वाधिक फायदा राष्ट्रवादी काँग्रेसला होत असल्याची चर्चा नेहमीच दबक्या आवाजात होत असते. काँग्रेस आणि शिवसेना या दोन्ही पक्षांना सत्तेचा फारसा फायदा होत नसल्याची भावना यातून वारंवार व्यक्त होताना दिसत आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर आता सरकार पडण्याची स्थिती निर्माण झाली असताना गेल्या अडीच वर्षांच्या कारभारामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांना 'व्हिलन' ठरवण्यात येत असल्याचे सध्याच्या आरोपांवरून स्पष्ट होत होत आहे.

राष्ट्रवादी मुळे अनेक अडचणी येत होत्या, हा या एकूण चर्चेचा सूर होता. यातच आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अजित पवार यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्याने भर पडली आहे. मुळातच काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांच्या सोबत काम करणे शक्य नाही. या दोन पक्षांपासून फारकत घेण्यात यावी, अशी मागणी बंडखोर एकनाथ शिंदे यांच्या गटाने केली आहे. गेली दोन-अडीच वर्षे सरकार स्थापन झाल्यापासून सर्व आमदारांची हीच भावना होती. मात्र, तब्बल अडीच वर्षांनंतर या भावनेला वाट करून देण्याचा प्रयत्न या आमदारांनी केला आहे.

---



### पुण्यात घाट विभागांत मुसळधारांचा अंदाज

## पुण्यात पाऊस, हवेत गारवा ; पाच दिवस मध्यम पावसाची शक्यता

पुढील चार ते पाच दिवस शहरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरात गुरुवारी (२३ जून) पावसाने हजेरी लावली. पुणे शहरात अनेक दिवसांपासून पावसाने हुलकावणी दिली होती. पुन्हा पावसाळी वातावरण निर्माण झाल्याने हवेत गारवा निर्माण झाला आहे. पुढील चार ते पाच दिवस शहरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. घाट माथ्यावरील काही भागांत मात्र मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेकडून व्यक्त करण्यात आला आहे.

पुणे शहर आणि जिल्ह्यामध्ये तीन ते चार दिवसांपासून ढगाळ वातावरण तयार झाले आहे. मुळशी त्याचप्रमाणे मावळ जिल्ह्यांतील घाट विभागात काही भागांत दोन दिवसांमध्ये जोरदार पावसाने हजेरी लावली. पिंपरी-चिंचवड शहरात बुधवारी (२२ जून) काही भागांत जोरदार पाऊस झाला. पुणे शहरात मध्यवर्ती भागात गेल्या काही दिवसांपासून केवळ ढगाळ आकाशाची स्थिती होती.

मात्र, गुरुवारी सकाळपासूनच पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात बदल झाला. दुपारी काही वेळ पावसाचा जोर वाढला. काही वेळातच पाऊस थांबला असला, तरी ढगाळ स्थिती कायम होती. त्यामुळे संध्याकाळी तापमानात

# शिवसेनेचा बंडखोरांना इशारा

### वेळीच सावध व्हा, नाहीतर सगळेच कायमचे 'माजी' होतील



। पुणे । महाईन्यूज ।

शिवसेनेत बंड झाल्यानंतर विधानसभा बरखास्त होणार का, असा प्रश्न विचारला जात आहे. शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे (eknath shinde) यांनी थेट मुख्यमंत्र्यांनाच आव्हान दिल्यानं राज्यातील राजकारणाला वेगळे वळण लागलं आहे. यावर शिवसेनेचे मुख्यपत्र 'सामना'तून भाजपवर टीकेचे बाण सोडले आहेत. आम्हाला भाजपच्या नैतिक अधिष्ठानाचे कौतुक वाटते. कालपर्यंत भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप सलेल्या शिवसेना आमदारांवर हल्ले करणारे, त्यांना ईडी, सीबीआय आणि इन्कम टॅक्सचा धाक दाखवून, "आता तुमची जागा तुरुंगात" असे बोलणाऱ्या किरीट सोमय्यांचे यापुढे कसे होणार ?

### वेळीच सावध व्हा, शहाणे व्हा,

जय-पराजय पचवले. सत्ता असली काय आणि गेली काय, शिवसेनेसारख्या संघटनेला फरक पडत नाही. फरक पडणार आहे तो भाजपच्या प्रलोभनांना व दबावास बळी पडलेल्या आमदारांना. शिवसैनिकांनी ठरवले तर हे सगळेच लोक कायमचे 'माजी' होऊ शकतील. यापूर्वीचा बंडाचा इतिहास तेच सांगतो. वेळीच सावध व्हा, शहाणे व्हा, असा सल्ला शिंदे गटाला देण्यात आला आहे.

### ते गरज संपताच पुन्हा कचऱ्यातच फेकून देतील

"शिवसेनेचे संघटन मजबूत आहे. त्यामुळे 'वेगळा गट' करून आसामात गेलेल्या लोकांना आमदार-नामदार होता आले. हे सर्व आमदार पुन्हा निवडणुकीला सामोरे गेले तर जनता त्यांना पराभूत केल्याशिवाय राहणार नाही. याचे भान या मंडळींना नसेलच असे नाही. त्यामुळे हे शिवसेनेचे आमदार व नामदार पुन्हा स्वगृही परत येतील. प्रवाहात सामील होतील. आज जे भाजपवाले त्यांना तळहातावरील फोडाप्रमाणे जपत आहेत ते गरज संपताच पुन्हा कचऱ्यातच फेकून देतील. भाजपची परंपरा तर हीच आहे," असे अग्रलेखात म्हटलं आहे.

### हे आता उघड झाले.....

कोणी कितीही जोरबैठका मारत असले तरी वादळ सरेल व आकाश स्वच्छ होईल. महाराष्ट्रात नवे सरकार स्थापन करण्याचे स्वप्न कुणाला पडलेच असेल तर तो त्यांचा स्वप्नदोष. राज्यसभा, विधान परिषद निवडणुकीतील 'जादा' विजय कोणामुळे मिळाला हे आता उघड झाले. आता तर आमदारांना डांबून ठेवले आहे, असे टीकास्त्र भाजपवर करण्यात आले.

### इतकी पळापळ का सुरू आहे?

राजकारणात सगळेच अस्थिर असते आणि बहुमत त्याहून चंचल असते. शिवसेनेच्या तिकिटांवर, पैशांवर, मेहनतीवर निवडून आलेले आमदार भाजपच्या पकडीत फसले. ते आधी सुरतला आणि नंतर विशेष विमानाने आसामला गेले. या आमदारांची इतकी पळापळ का सुरू आहे? शिवसेनाअंतर्गत ज्या घडामोडी सुरू आहेत. त्याच्याशी आपला संबंध नाही वगैरे मखलाशी भाजपने तरी करू नये.

# पाऊले चालती पंढरीची वाट..!



पिंपरी-चिंचवड । कोरोनाचं सावट थोडं शमल्यानंतर आता अनेक दिंड्या, पालख्या पंढरपूर कडे प्रस्थान ठेवणार आहेत. यामध्ये संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर यांच्या मानाच्या पालख्यांचाही समावेश आहे. काल या दोन्ही पालख्या पुणे नगरीमध्ये दाखल झाल्या होत्या यावेळी पुणेकरांनी मोठ्या उत्साहात त्याचं स्वागत करत दर्शन घेतले. सामान्यांसोबत पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

- संत तुकोबा आणि ज्ञानोबांच्या पालखीने दुमदुमली पुणे नगरी
- वैष्णवांचा मेळा, मान्यवरांनीही घेतले दर्शन
- गळा भेट घेण्या भिमेची निघाली तुझ्या जयघोषात इंद्रायणी

### पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांना अभिवादन

# डॉ. मुखर्जी यांच्यामुळे देशाला 'एक भारत श्रेष्ठ भारत' विचार मिळाला

### आमदार महेश लांडगे यांचे प्रतिपादन

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



जम्मू - काश्मीरमधील ३७० कलम हटवण्यासाठी डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी शेवटपर्यंत संघर्ष केला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. मुखर्जी यांचे स्वप्न पूर्ण केले. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' हा विचार भारतीयांच्या मनात रुजवण्याचे काम डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी केले, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.

भारतीय जनसंघाचे संस्थापक, राष्ट्रीय नेते डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुरूवारी मोरवाडी येथील भारतीय जनता पार्टीच्या मध्यवर्ती कार्यालयामध्ये त्यांच्या प्रतीमेस अभिवादन करण्यात आले.

यावेळी शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, माजी खासदार अमर साबळे, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस विजय फुगे, माजी महापौर राहुल जाधव, नंदू कदम, वैशाली खाड्ये, राजश्री जायभाय, वीणा सोनवलकर, कैलास सानप, विजय शिनकर, हेमंत देवकुळे, संजय परळीकर व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, जम्मू काश्मीरला इतर राज्यांप्रमाणे समान दर्जा, समान नागरी कायदा, गोवंश हत्याबंदी कायदा अशा महत्त्वाच्या मुद्यांचे डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी समर्थन केले आहे. १९५१ मध्ये त्यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. जम्मू-कश्मीरमधील ३७० कलम रद्द करण्यासाठी त्यांनी आंदोलन उभा केले. त्यामध्येच त्यांना आपले प्राण गमवावे लागले. त्यानंतर ६६ वर्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे कलम रद्द करुन डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे स्वप्न पूर्ण केले.

## संपादकीय »

# अन् हाती आले धुपाटणे..!

***उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या स्वभावधर्माप्रमाणे शिवसेनेचे पदाधिकारी नियुक्त करण्यास सुरुवात केली. उद्धव ठाकरे यांच्या या नव्या दमाच्या शिवसेनेत त्यांनी एका विशिष्ट प्रकारचा सुसंस्कृतपणा आणण्याचा प्रयत्न केला. मात्र उद्धव ठाकरे यांचा हाच सुसंस्कृतपणा शिवसेनेच्या जुन्या जाणत्या आणि प्रस्थापित शिवसेना नेत्यांना पदाधिकाऱ्यांना अडचणीचा ठरू लागला.***

राज्याचे नगर विकास मंत्री आणि शिवसेनेचे मातब्बर नेते एकनाथ शिंदे यांच्या शक्तीशाली बंडाने आघाडी सरकारलाच सुरुंग लावलाच आहे, मात्र त्याहीपेक्षा म्हणजे शिवसेनेच्या आणि शिवसेनेवर स्थापनेपासून रिमोट कंट्रोल असलेल्या ठाकरे कुटुंबीयांच्या आजवरच्या निर्विवाद सत्तेवरदेखील मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शिवसेनेसारख्या कोणे एके काळी अत्यंत जहाल आक्रमक मराठी भूमिपुत्रांच्या आणि त्यानंतर कट्टर हिंदुत्ववादी संघटनेसमोर ही वेळ का आली याचा खरंच गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. शिवसेनेचे नेतृत्व शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे होते तोपर्यंत शिवसेनेचा चेहरा हा अत्यंत आक्रमक होता. अरे ला कारे करण्याची हिंमत असलेले बेडर आणि बहादूर शिवसैनिक हीच शिवसेनेची मराठी जनमानसामध्ये सर्वमान्य प्रतिमा होती. घरगुती भांडणापासून अगदी मोठ्या राड्यापर्यंतची सर्व भांडणे त्या वेळी शिवसेनेच्या शाखेत सोडवली जात असत. शिवसेनेचा शाखाप्रमुख हादेखील त्यावेळी सर्वपक्षीय चर्चेचा विषय असे. मात्र हळूहळू शिवसेनेची सूत्रे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्यापासून त्यांचे पुत्र उद्धव ठाकरे यांच्याकडे आली आणि शिवसेनेचा चेहरामोहरा बदलायला सुरुवात झाली.

उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या स्वभावधर्माप्रमाणे शिवसेनेचे पदाधिकारी नियुक्त करण्यास सुरुवात केली. उद्धव ठाकरे यांच्या या नव्या दमाच्या शिवसेनेत त्यांनी एका विशिष्ट प्रकारचा सुसंस्कृतपणा आणण्याचा प्रयत्न केला. मात्र उद्धव ठाकरे यांचा हाच सुसंस्कृतपणा शिवसेनेच्या जुन्या जाणत्या आणि प्रस्थापित शिवसेना नेत्यांना पदाधिकाऱ्यांना अडचणीचा ठरू लागला. बाळासाहेब ठाकरे हे करिष्माकारी नेते होते. परप्रांतीयांच्या अन्यायाने, अत्याचाराने गांजलेल्या मराठी माणसाचा बाळासाहेब हे आतला आक्रमक आवाज होते. बाळासाहेबांची भाषणे म्हणजे मनातून अन्यायाविरुद्ध पेटून उठलेल्या तमाम मराठी तरुणांच्या आणि त्यानंतर हिंदुत्वाच्या ठिणग्या होत्या. नगरसेवक म्हणून निवडून यायचे असेल अथवा आमदार, खासदार, मंत्री, केंद्रीय मंत्री व्हायचे असेल तर ते बाळासाहेबांशिवाय शक्य नव्हते. त्यामुळेच लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आला काय, पडला काय किंवा तो दुसऱ्या पक्षात फुटून गेला काय.. शिवसेनाप्रमुखांनी त्याची पर्वा कधीच केली नाही.



## आनंदी सकाळ

# जगन्नियंता परमात्मा नियामक व नियंता

संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराजांना भगवंतांनी स्वप्नात दर्शन देऊन, 'सुंदर अभंगांची रचना करा,' असा आदेश दिला. 'आपल्यावर सरस्वतीची कृपा आहे. आपली अभंग गाथा लोकमान्य होईल,' असे भगवंताकडून वरदान प्राप्त झाले. 'भगवंताने आशीर्वाद दिले आहेतच, तर आज्ञापालन करू. सर्व उत्तमच होणार आहे; कारण तोच माझा रक्षक आहे,' असा विचार करून महाराजांनी अभंग लिहायला घेतले. 'पहिला अभंग देवाच्या वंदनाचा असावा,' आणि त्याच क्षणी श्रीगणेशाचे व पांडुरंगाचे एकत्रित मंगल ज्यात सहज होणार होते, अशा 'ओंकारा'चे त्यांना स्मरण झाले. श्री तुकाराम महाराजांना विलक्षण आनंद झाला. पांडुरंगाच्या कृपाशीर्वादानेच मंगलाचा अभंग रचला गेला, तो वरीलप्रमाणे. या अभंगाचा अर्थ असा, 'एक ओंकार, त्या ओंकारापासून ब्रह्मा, विष्णू, महेश व पुढे सर्व विश्व आणि वेद यांची निर्मिती झाली. विश्वरूप धारण करणारा तू पांडुरंग आहेस,' असे वर्णन करून महाराज पुढे म्हणतात, 'तूच विश्वाचा आदि असून हे विश्व तुझेच रूप आहे.

# शिवसेनेचा अट्टाहास, भाजपचा थयथयाट !






महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे काही बंडाचे वारे शिरले आहे, त्याला शिवसेनेचा अट्टाहास, भाजपचा थयथयाट कारणीभूत आहे. आता त्यातून कसा मार्ग काढायचा हे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावरच प्रामुख्याने अवलंबून आहे. कारण मागे देवेंद्र फडणवीसांनी अजित पवार आणि त्यांच्या समर्थक आमदारांना हायजॅक करून पवारांना असाच धक्का दिला होता. आता त्यांनी शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांना हायजॅक करून तसाच धक्का पवारांना परत दिला आहे. शरद पवारांनी अजित पवारांना परत आणून फडणवीसांच्या पंखातील हवा काढली होती, आताही ठाकरे सरकारच्या आशा या शरद पवारांवरच अवलंबून आहेत, आता शरद पवार फडणवीसांवर मात करतात की, फडणवीस यावेळी यशस्वी होतात ते आता पहावे लागेल.

महाराष्ट्र सध्या राजकीय वादळात सापडलेला आहे. त्याला एकेकाळी हिंदुत्वाच्या जाहीरपणे आणा भाका घेणाऱ्या शिवसेनेचा अट्टाहास आणि भाजपचा थयथयाट कारणीभूत आहे. २०१९ साली महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक झाली. त्यावेळी भाजप आणि शिवसेनेने युतीत निवडणूक लढवली होती, पण त्यावेळी मुख्यमंत्रीपदाचे आश्वासन केंद्रीय मंत्री अमित शहांनी आम्हाला दिले होते, तसेच आम्ही शिवसैनिकाला मुख्यमंत्री करण्याचे वचन स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना दिले होते, त्यामुळे मुख्यमंत्रीपद आपल्याला हवे, असा हट्ट शिवसेनेने लावून धरला. सुरुवातीला भाजपला असे वाटत होते की, २०१४ साली महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक भाजप आणि शिवसेनेने युती तोडून स्वतंत्रपणे लढवली होती. मोदी लाट असल्यामुळे आता आपण मुख्यमंत्रीपदाची आलेली संधी कशाला सोडा म्हणून भाजपलाही काही युतीची गरज नव्हती. त्यामुळे दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे एकमेकांच्या विरोधात मैदानात उतरले.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी तर भाजप आणि त्यांच्या केंद्रीय आणि राज्य पातळीवरील नेत्यांचा समाचार घेताना अजिबात हात राखून ठेवला नाही. भाजपवर आपण टोकाची टीका केली, तर राज्यातील लोक आपल्याला बहुमत देतील आणि आपले बहुमताचे सरकार राज्यातील येईल, असे वाटत होते. भाजपनेही तसाच पवित्रा घेतला होता, मोदी लाटेचा पुरेपुर उपयोग करून त्यांनाही बहुमत मिळवून त्यांना आपल्या पक्षाचा मुख्यमंत्री आणायचा होता. या निवडणुकीत पंतप्रधानपदी असलेली नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात २६ प्रचारसभा घेतल्या, शेवटी मोदींचा आवाजही बसला, इतकी मेहनत घेऊनही त्यावेळी भाजपला त्यावेळी १२२ आमदार निवडून आणता आले, त्यांना बहुमतापर्यंत पोहोचत आले नाही. त्यावेळी देवेंद्र फडणवीस त्यांनी सत्तास्थापनेचा दावा केला.

# या चिमण्यांनो, परत फिरा रे!

**शिवसेना जन्माला आल्यापासून पक्ष सोडणाऱ्यांचा, बंडखोरांचा, वेगळी चूल मांडणाऱ्यांचा, पक्षातून काढलेल्यांचा आणि न ऐकणाऱ्यांना धडा शिकविल्याचा असा प्रदीर्घ इतिहास आहे.**

'प्रतिशिवसेना' स्थापणारे आद्य शिवसैनिक बंडू शिंगरे यांच्यापासून 'आमचीच शिवसेना खरी' असा दावा करणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्यापर्यंतचा ही मोठी मांदियाळी आहे. इतक्या फुटींना, बंडांना आणि धक्क्यांना तोंड देत शिवसेना टिकली, वाढत राहिली आणि तीनदा राज्याच्या सत्तेत आली. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे बुधवारचे भाषण हे वरवर निरोपाचे आणि निरवानिरवीचे वाटले, तरी ते प्रत्यक्षात ते आपण युद्धाला तयार आहोत, असे सांगणारे होते. 'मी मुख्यमंत्रिपदच नव्हे, तर पक्षप्रमुख हे पदही सोडायला तयार आहे. फक्त समोर येऊन मला ते सांगा,' ही सरळच आव्हानाची भाषा आहे. बाळासाहेब ठाकरे यांनीही अनेकदा शिवसेनाप्रमुख पदाचा राजीनामा घोषित करून आपले अनन्य स्थान पक्के केले होते. तोच प्रयोग उद्धव ठाकरे वेगळ्या प्रकारे करीत आहेत. असे असले, तरी या क्षणी परिस्थिती अधिक बिकट, कसोटी पाहणारी आणि मित्रपक्षांचे संभाव्य



उपकार वाढविणारी आहे. 'कोणत्याही शिवसैनिकाने मुख्यमंत्री व्हावे,' असे मुख्यमंत्री म्हणाले असले, तरी त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याशी असणाऱ्या आघाडीविषयी चकार शब्द काढला नाही. म्हणजेच, बंडखोरांच्या 'भाजपसमवेत जायला हवे' या मुख्य मागणीला त्यांनी वाटाण्याच्या अक्षता लावल्या. अर्थात, तेच अपेक्षित होते. मित्रपक्ष सोबत असताना आपलेच साथीदार निघून जावेत, ही व्यथा मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखवली. तशीही ती लपत नव्हती. मुख्यमंत्र्यांच्या भाषणाला निराशेचा किंवा माघारीचा वर्ख असला, तरी त्यात खऱ्याखुऱ्या आत्मपरीक्षणाचा गंभीर स्वर होता का, हा प्रश्न आहे. ते 'धक्का बसला' असे म्हणत असले, तरी इतकी वेळ येईपर्यंत आपण बेसावध का राहिलो किंवा आपले काही चुकते आहे का, असा प्रश्न स्वत:ला कधी विचारला का, याचे उत्तर त्यांच्या या छोटेखानी भाषणातून मिळाले नाही.

देश फार झपाट्याने बदलत असताना, येथील सगळ्यांच प्रादेशिक व राष्ट्रीय पक्षांच्या 'घराणेशाही'चे काय होणार, हा कळीचा प्रश्न या निमित्ताने पुन्हा पुढे येतो आहे. पंजाबात क्रमाक्रमाने बादल घराण्याची मालमत्ता बनलेल्या अकाली दलाला मतदारांनी अलीकडेच निरोप दिला. बिहारमधील लालूप्रसाद किंवा उत्तर प्रदेशातील मुलायमसिंह यांच्या पक्षांच्या अपयशाकडेही याही दृष्टीने पाहावे लागेल. देशभरात आज असे अनेक एकखांबी पक्ष आहेत. त्यांचे सारे संचालन एक कुटुंबच करते. मग सत्ता आली, की तेच कुटुंब कायम केंद्रस्थानी राहते. अजित पवार यांनी पहाटे गुप्त शपथ घेऊनही तेच पुन्हा उपमुख्यमंत्री झाले, याचे इंगित हीच घराणेशाही आहे.

## ।। अभंगवाणी ।।



त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा ।
कठिण हें जिवा तोंचिवरी ॥१॥
मागिलांचे दुःख लागों नेदी अंगा
। अंतर हें संगा नेदी पुढें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### आघाडीतून बाहेर पडण्यावर शिंदे ठाम

। मुंबई। महाईन्यूज ।

शिवसेना आणि शिवसैनिक टिकविण्यासाठी अनैसर्गिक महाविकास आघाडीतून बाहेर पडणे अत्यावश्यक असून, महाराष्ट्रहितासाठी आता निर्णय घेणे गरजेचे आहे, असे आवाहन बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांनी बुधवारी मुख्यमंत्र्यांना केले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अप्रत्यक्षपणे दिलेला मुख्यमंत्रिपदाचा प्रस्ताव शिंदे यांनी फेटाळला आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी 'फेसबुक लाईव्ह'द्वारे बोलताना बंडखोर आमदारांना समोरासमोर येऊन बोलण्याचे आवाहन केले होते तसेच शिंदे यांना अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्रीपदाचा प्रस्ताव दिला होता. महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठकीत शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाचा प्रस्ताव देऊन बघावा, अशी चर्चा झाली होती.

एकनाथ शिंदे यांनी मात्र उद्धव ठाकरे यांचा प्रस्ताव फेटाळून लावला. गेल्या अडीच वर्षांत महाविकास आघाडी सरकारचा फायदा फक्त कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस या घटक पक्षांनाच झाला. शिवसैनिक भरडला गेला. शिवसेनेच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये घटक पक्ष मजबूत होत असताना शिवसैनिकांचे व शिवसेनेचे

# एकनाथ शिंदेंच्या बंडामागे भाजपाचा हात?

## अजित पवार आणि शरद पवारांचे परस्परविरोधी वक्तव्यं

। मुंबई ।महाईन्यूज ।

शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी पुकारलेल्या बंडाच्यामागे भारतीय जनता पार्टीच असल्याचं मत शरद पवार यांनी व्यक्त केलं आहे. राज्यामध्ये निर्माण झालेल्या सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर यशंवतराव चव्हाण सेंटरमध्ये शरद पवारांनी राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांची बैठक घेतली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना शरद पवारांनी एकनाथ शिंदे आणि बंडखोर आमदारांसाठी सर्व सुविधा पुरवण्यामागे भाजपाचा हात असल्याचं म्हटलं आहे. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री आणि शरद पवार यांचे पुतणे अजित पवार यांनी या बंडामागे भाजपाचा हात असल्याचं वाटत नसल्याचं काही वेळापूर्वी म्हणाल्यानंतर लगेच शरद पवारांनी हा मुद्दा खोडून काढला. यामुळे एकनाथ शिंदेंच्या बंडावरुनच शरद पवार आणि अजित पवार यांच्या भूमिकेमध्ये मतभेद असल्याचं दिसून आलं. पवारांनी निवडणूक आयोगानुसार राष्ट्रीय पक्ष कोणते आहेत याची यादी वाचून दाखवली. त्यामध्ये भाजपा, मायावती, सीपीआय, सीपीआयएम, कॉंग्रेस, राष्ट्रवादी ही नावं घेतली. त्यानंतर पुढे बोलताना शरद पवारांनी,



"भाजपाचे गुजरात राज्याचे अध्यक्ष पाटील यांचा सहभाग असेल याचा अर्थ काय समजायचा? आसाममध्ये संपूर्ण व्यवस्था करण्यामध्ये तेथील राज्य सरकार अतिशय सक्रीय आहे. तिथलं राज्य सध्या भाजपाच्या हातात आहे. नावं घ्यायची गरज नाही. तिथं जे दिसतायत त्यावरुन कोण आहे हे कळतंय," असं म्हणत भाजपावर निशाणा साधलाय.

शरद पवार यांनी यावेळी बोलताना अजित पवारांपेक्षा आपल्याला गुवाहाटी आणि राज्याबाहेरील राजकारणाची अधिक माहिती असल्याचंही म्हटलं. त्याचप्रमाणे शरद पवार यांनी बंडखोर आमदार पुन्हा मुंबईत येतील तेव्हा ते नक्कीच उद्धव ठाकरेंचे नेतृत्व स्वीकारतील असा विश्वास व्यक्त केला.

पवारांनी निवडणूक आयोगानुसार राष्ट्रीय पक्ष कोणते आहेत याची यादी वाचून दाखवली. त्यामध्ये भाजपा, मायावती, सीपीआय, सीपीआयएम, कॉंग्रेस, राष्ट्रवादी ही नावं घेतली. त्यानंतर पुढे बोलताना शरद पवारांनी, "भाजपाचे गुजरात राज्याचे अध्यक्ष पाटील यांचा सहभाग असेल याचा अर्थ काय समजायचा? आसाममध्ये संपूर्ण व्यवस्था करण्यामध्ये तेथील राज्य सरकार अतिशय सक्रीय आहे. तिथलं राज्य सध्या भाजपाच्या हातात आहे. नावं घ्यायची गरज नाही. तिथं जे दिसतायत त्यावरुन कोण आहे हे कळतंय, " असं म्हणत भाजपावर निशाणा साधलाय.शरद पवार यांनी यावेळी बोलताना अजित पवारांपेक्षा आपल्याला गुवाहाटी आणि राज्याबाहेरील राजकारणाची अधिक माहिती असल्याचंही म्हटलं. त्याचप्रमाणे शरद पवार यांनी बंडखोर आमदार पुन्हा मुंबईत येतील तेव्हा ते नक्कीच उद्धव ठाकरेंचे नेतृत्व स्वीकारतील असा विश्वास व्यक्त केला.

### अजित पवार काय म्हणाले?

एकनाथ शिंदे यांना मागील दोन दिवसांमध्ये ४६ आमदारांनी समर्थन दर्शवलं आहे. शिंदे हे मंगळवारी काही बंडखोर आमदारांसोबत सुरतला गेले. त्यानंतर बुधवारी पहाटे ते बंडखोर आमदारांसोबत गुवाहटीमध्ये दाखल झाले. सध्या हे सर्व आमदार गुवाहटीमध्येच असून ठाकरे सरकार अल्पमतात जाण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर सकाळपासून मुंबईमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या दोन बैठकी पार पडल्यानंतर सायंकाळी शरद पवारांनी यशंवतराव चव्हाण सेंटरमध्ये राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांची बैठक घेतली. या बैठकीनंतर पत्राकारांशी बोलताना अजित पवारांना या बंडामागे भाजपा आहे असं वाटतं का असा प्रश्न विचारला. त्यावर उत्तर देताना, "अजून तरी तसं काही दिसलं नाही," असं म्हटलंय. पत्रकार परिषदेमध्ये पुन्हा एकदा हाच प्रश्न अजित पवारांना विचारण्यात आला तेव्हा त्यांनी, "आताच्या घडीला कुठलाही भाजपाचा नेता किंवा मोठा चेहरा तिथं येऊन काही करतोय असं दिसत नाही," असं अजित पवारांनी स्पष्टपणे सांगितलं.

### शरद पवार काय म्हणाले?

शरद पवार यांना अजित पवारांनी एकनाथ शिंदेंच्या बंडामागे भाजपा असल्याचं वाटत नाही असं म्हटल्याचं सांगत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर शरद पवारांनी, "अजित पवार यांनी फक्त मुंबईमधील परिस्थिती पाहून वक्तव्य केलेलं असावं. त्यांना राज्याबाहेरची परिस्थिती माहिती नाही. ती आम्हाला माहीत आहे," असं उत्तर दिलं. पुढे बोलताना शरद पवारांनी, "आपण एकनाथ शिंदेंचा एका व्हिडीओ पाहिला ज्यामध्ये त्यांनी आम्हाला एका राष्ट्रीय पक्षाचा पाठिंबा आहे असं सांगितलं," असंही म्हटलं.

# "मविआला कसलाही धोका नाही"

## एकनाथ शिंदेंच्या बंडखोरीदरम्यान नाना पटोले यांचं विधान

। मुंबई । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी

मागील तीन दिवसांपासून महाराष्ट्रात राजकीय उलथापालथ सुरू आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे आपल्यासोबत ३० हून अधिक आमदारांना घेऊन गुवाहाटीला गेले आहेत. त्यानंतर महाराष्ट्रातील काही उर्वरित आमदार देखील गुवाहाटीला पोहोचले आहेत. त्यामुळे शिंदे गटाचं संख्याबळ वाढताना दिसत असून शिवसेनेला मोठं खिंडार पडलं आहे. अशी एकंदरीत स्थिती असताना महाराष्ट्रातील महाविकास आघाडीला कसलाही धोका नसल्याचं विधान महाराष्ट्र कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी



केलं आहे. एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीबाबत विचारलं असता नाना पटोले म्हणाले, "एकनाथ शिंदे यांच्या प्रस्तावाबाबत काय करायचं? हा शिवसेनेचा अंतर्गत प्रश्न आहे. महाविकास आघाडीला कोणताही धोका नाही. या सर्व षडयंत्रापाठीमागे भारतीय जनता पार्टी आहे," असा आरोपही त्यांनी यावेळी केला. सध्याच्या घडीला तुम्ही मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या पाठीशी आहात का? असं विचारलं असता नाना पटोले म्हणाले की, "बिलकुल आम्ही मुख्यमंत्र्यांच्या पाठीशी आहोत. काल सायंकाळी मी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, आम्ही तुमच्यासोबत आहोत, असं सांगितलं. तसेच तुम्ही जे म्हणाल ते आम्ही करायला तयार आहोत, असं आश्वासनही दिलं. महाविकास आघाडीच्या स्थापनेवेळी सोनिया गांधी यांनी जो आशीर्वाद दिला होता. तो आजही आमच्यासोबत कायम आहे. कॉंग्रेसचे सर्व आमदार त्यांच्यासोबत आहेत," असंही ते म्हणाले.'महाविकास आघाडी नको, वेगळा पर्याय हवा' एकनाथ शिंदेच्या या प्रस्तावाबाबत विचारलं असता नाना पटोले म्हणाले, "आमची कोणालाही जबरदस्ती नाही, आधीही आमची कोणाला जबरदस्ती नव्हती आणि आजही नाही. विरोधी पक्ष म्हणून लोकांनी आम्हाला निवडून दिलं होतं. त्यामुळे आम्ही सत्तेत जाण्यासाठी त्यांच्याकडे गेलो नव्हतो. ते आमच्याकडे आले होते.

### एकनाथ शिंदे प्रकरण

# "तेरा घमंड तो चार दिन का है पगले..."

## संजय राऊतांच्या घरासमोर झळकले बॅनर्स

। मुंबई । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी



राज्यामध्ये सुरु असणाऱ्या अभुतपूर्व सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेत उभी फूट पडली आहे. शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे विरुद्ध शिवसेना असा संघर्ष मागील काही दिवसांपासून दिसून येत असतानाच शिवसेनेची बाजू पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत प्रसारमाध्यमांसमोर मांडताना दिसत आहेत.

बुधवारी राज्याचे मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपदाबरोबरच पक्षप्रमुखपदही सोडण्याची ऑफर बंडखोर आमदारांना दिली. राज्यातील या सत्तासंघर्षामध्ये शिंदे गट आणि शिवसेनेकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. त्यातच आता बंडखोर नेत्यांना थेट आव्हान देणारी बॅनर्स मुंबईत झळकल्याची चित्र दिसत आहेत.

# शिवसेना बॅकफूटवर !

## शिंदे गोटातील आमदारांच्या वाढत्या संख्येमुळे उद्धव ठाकरेंची माघार!

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे (Eknath Shinde) यांच्या गोटात वेळेनुसार संख्या वाढत आहे. शिंदे यांच्या गोटात आता शिवसेनेचे ३७ आणि अपक्ष ९ असे तब्बल ४६ आमदार झाले आहेत. शिंदे यांना पक्षांतर बंदीच्या कायद्यातून वाचण्यासाठी ३७ आमदारांची आवश्यकता होती, ती संख्या आता पूर्ण झाली आहे. त्यामुळे त्यांना वेगळा गटस्थापनेसाठी कायदेशीर कोणतीही अडचण नाही, हे लक्षात आल्याने राज्यात शिवसेना (Shivsena) बॅकफूटवर गेलेली पाहायला मिळत आहे. आज सकाळपासून शिवसेनेने आपली भूमिका बदलली आहे.

कालपर्यंत शिवसेनेने बंडखोर आमदारांवर कारवाईचा बडगा उचलण्याचा इशारा दिला होता. 'माघारी या अन्यथा सदस्यत्व घालवून बसला' असा इशारा दिला होता. आम्ही लढणारे लोक, शेवटी सत्याचा विजय होईल, आम्ही शेवटपर्यंत लढू, बहुमत सिद्ध करु, असे म्हणतं होते. एकूणच शिवसेना नरमाईच्या भूमिकेमध्ये दिसून येत नव्हती.

मात्र आज शिवसेनेने बंडखोर आमदारांपुढे चर्चेचा प्रस्ताव ठेवला आहे.



शिवसेना नेते संजय राऊत यांनी आज सकाळी माध्यमांशी बोलताना शिवसेना महाविकास आघाडीतून बाहेर पडण्यासाठी तयार आहोत. फक्त आमदारांनी २४ तासात मुंबईत यावं अशी ऑफर दिली. त्यापाठोपाठ चर्चेतून मार्ग निघू शकतो. चर्चा होऊ शकते. घरचे दरवाजे उघडे आहेत. का उगाच वण वण भटकताय? गुलामी पत्करण्यापेक्षा स्वाभिमानाने निर्णय घेऊ, असे ट्विट करत बंडखोर आमदारांना पुन्हा एकदा चर्चेचे निमंत्रण देण्यात आलं आहे. मात्र यावर एकनाथ शिंदे आता चर्चेची वेळ निघून गेली असल्याचं सांगत राऊत यांचा प्रस्ताव धुडकावून लावला आहे.

शिवसेनेच्या या बदलेल्या भूमिकेनंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पोटात गोळा आला आहे. या दोन्ही पक्षांनी शेवटपर्यंत उद्धव ठाकरे यांची साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र विकास आघाडी हे महाराष्ट्राचा विकास आणि कल्याणासाठी स्थापन झालेले सरकार आहे. उद्धव ठाकरे यांच्यासोबत आम्ही शेवट पर्यंत ठामपणे उभे आहोत, असे आज राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले आहे.

तर काँग्रेसनेही उद्धव ठाकरे यांना आपला पाठिंबा जाहिर केला आहे. महाविकास आघाडीत मुख्यमंत्रीपदाबाबत जो निर्णय उद्धव ठाकरे घेतील त्याला काँग्रेसचा पाठिंबा असेल, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले आहे. मात्र त्याचवेळी राऊत यांनी भूमिका बदलल्याने काँग्रेस पुन्हा एकदा विचार करणार असल्याची माहिती काँग्रेसच्या

## शॉर्ट न्यूज »


### अफगाणिस्तानात भूकंपाचे धक्के

। काबूल। महाईन्यूज । प्रतिनिधी।

अफगाणिस्तानच्या पूर्व भागात बुधवारी पहाटे झालेल्या ६.१ रिश्टर स्केल तीव्रतेच्या मोठ्या भूकंपाच्या धक्क्यामुळे एक हजार जण मृत्युमुखी पडले, तर सुमारे दीड हजारांवर जखमी झाले आहेत. अफगाणिस्तानच्या 'बख्तर' या अधिकृत वृत्तसंस्थेने ही माहिती दिली. भूकंपग्रस्तांसाठी मदत व बचावकार्य सुरू असले तरी त्यात अडथळे येत आहेत. भूकंपग्रस्त ग्रामीण भाग प्रामुख्याने डोंगराळ असल्यानेही अडचणी येत आहेत. त्यामुळे मृतांची संख्या वाढण्याचीही भीती व्यक्त होत आहे. गेल्या दोन दशकांतील अफगाणिस्तानमध्ये आलेला हा सर्वात विनाशकारी भूकंप आहे. गेल्या वर्षी अमेरिकेच्या सैन्याने अफगाणिस्तानातून माघार घेतल्यानंतर तालिबानने येथील सत्ता काबीज केल्यानंतर अनेक आंतरराष्ट्रीय मदत संस्थाही या देशातून निघून गेल्यानेही मदत मोहिमेत अडचणी येत आहेत. अद्याप किती नुकसान झाले, त्याचा तपशील समजू शकलेला नाही. या भूकंपग्रस्त दुर्गम डोंगराळ भागात कच्च्या बांधकामाची घरे आणि इतर इमारतीही पुरेशा मजबूत नाहीत आणि येथे भूस्खलनही सातत्याने होत असते.

# राज्यात पूर आला असताना पाहुणचार कसला करताय?

## गुवाहाटीमध्ये हॉटेलबाहेर तृणमूल काँग्रेसचं आंदोलन



।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्रात राजकीय पेच निर्माण झाला असताना तृणमूल काँग्रेसनेही आता यामध्ये उडी घेतली आहे. शिवसेना नेते एकनाथ शिंदे आमदारांसोबत थांबलेल्या गुवाहाटीमधील हॉटेलबाहेर तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून आंदोलन केलं जात आहे. राज्यात पूर आल्याने लोकांचा जीव जात असताना महाराष्ट्रातील लोकांचं आदरातिथ्य केलं जात असल्याने तृणमूलच्या नेत्यांकडून आक्षेप घेतला जात आहे.

एकनाथ शिंदे इतर आमदारांसोबत गुवाहाटीमधील रॅडिसन ब्लू हॉटेलमध्ये थांबले आहेत. या हॉटेलबाहेर तृणमूल काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते भाजपाविरोधात आंदोलन करत आहेत. "आसामला पुराचा फटका बसला असताना भाजपा मात्र घोडेबाजार करण्यात व्यग्र आहे. केंद्राकडून एक रुपयाची मदतही अद्याप मिळालेली नाही. भाजपा आमदारांची विक्री करण्यात व्यग्र आहे," अशी टीका तृणमूलच्या नेत्याने केली आहे.

पोलिसांनी तृणमूलचे नेते रिपून बोरा यांना इतर आंदोलकांसहित हटवलं आहे. बोरा यांनी मुख्यमंत्री हेमंत बिस्वा यांच्यावर टीका करताना पुरामुळे लोकांचा जीव जात असताना महाराष्ट्रातील असंतुष्ट लोकांचं आदरातिथ्य करण्यात व्यग्र आहेत अशी टीका केली आहे.

> ⏭ शिवसेना नेते एकनाथ शिंदे आमदारांसोबत थांबलेल्या गुवाहाटीमधील हॉटेलबाहेर तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून आंदोलन केलं जात आहे. राज्यात पूर आल्याने लोकांचा जीव जात असताना महाराष्ट्रातील लोकांचं आदरातिथ्य केलं जात असल्याने तृणमूलच्या नेत्यांकडून आक्षेप घेतला जात आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पावसाने महामार्गाचे नुकसान



।श्रीनगर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

जम्मू-काश्मीरमधील अनेक भागांत मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे महत्त्वाच्या जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील बांधकाम सुरू असलेल्या पुलाचा १५० फूट भाग पाण्याखाली गेला आहे. दरम्यान, रामबन आणि उधमपूर जिल्ह्यात दरड कोसळल्याने बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी महामार्ग बंद ठेवावा लागल्याने शेकडो वाहने अडकून पडली.

जम्मू विभागातील पुंछ आणि राजौरी जिल्ह्यांना दक्षिण काश्मीरच्या शोपियां जिल्ह्याशी जोडणारा मुगल रस्ताही भूस्खलनामुळे वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले

# कर्नाटकमध्ये आमदारांची गुंडागर्दी

## प्राचार्यांवर हात उगारल्यामुळे आमदारांवर मोठ्या प्रमाणात टीका

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

कर्नाटकमध्ये जनता दल सेक्युलर (जेडीएस) आमदार एम श्रीनिवास यांनी एका महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कानशिलात लगावल्याची घटना घडली आहे. संगणक लॅबसाठी सुरु असलेल्या विकासकामाबाबत प्राचार्य स्पष्ट उत्तर देऊ शकले नाहीत. त्यामुळे संतापलेल्या आमदार एम श्रीनिवास यांनी त्यांना कानशिलात लगावली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. प्राचार्यांसोबत असे वर्तन केल्याबद्दल लोकांनी श्रीनिवासवर ताशेरे ओढले आहेत.



### आयुक्तांकडे तक्रार करणार

या घटनेबाबत मंड्या जिल्ह्याचे कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शंभू गौडा यांनी मंगळवारी ही बाब जिल्हा आयुक्तांच्या निदर्शनास आणून देणार असल्याचे सांगितले. गौडा यांनी असोसिएशनची तातडीची बैठक बोलावली आहे. त्यांनी प्राचार्य नागानंद यांचीही भेट घेत त्यांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले..

### सार्वजनिकरित्या प्राचार्यांवर हात उगारल्यामुळे मोठ्या प्रमाणात टीका

आमदार श्रीनिवास यांनी महाविद्यालयाला भेट दिली असता महाविद्यालयाचे प्राचार्य नागानंद यांनी महाविद्यालयाच्या विकासकामांची योग्य माहिती आमदारांना दिली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे मुख्याध्यापकांच्या वागण्याने नाराज झालेल्या आमदार एम श्रीनिवास यांनी मुख्याध्यापकांना जाहीर चपराक मारली. आमदारांनी अनेकवेळा प्राचार्यांवर हात उगारला. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओही समोर आला आहे. त्याचवेळी सोशल मीडियावर लोकांनी आमदार श्रीनिवास यांना सार्वजनिकरित्या प्राचार्यांवर हात उगारल्यामुळे आमदारांवर मोठ्या प्रमाणात टीका करण्यात येत आहे.

# मराठमोळ्या स्मिता पाटीलच्या रागावर फिदा होते राज बब्बर, पण प्रेमकहाणीचा शेवट झाला दुःखद

बॉलिवूड ते राजकारण असं दुहेरी यश मिळवणारे अभिनेता राज बब्बर यांचा आज वाढदिवस. २३ जून १९५२ रोजी जन्मलेल्या राज बब्बर यांनी ८० च्या दशकात संपूर्ण बॉलिवूड राज्य केलं होतं. नाटकांपासून करिअरची सुरुवात करत त्यांनी बॉलिवूड आणि नंतर राजकारणात प्रवेश असा यशस्वी प्रवास केला. जेव्हा राज बब्बर यांचं नाव घेतलं जात तेव्हा त्यांच्या बॉलिवूड आणि राजकीय कारकिर्दीसोबतच आणखी एक गोष्ट चर्चेत असते ती म्हणजे राज बब्बर यांचं खासगी आयुष्य. ८० दशकातील प्रसिद्ध अभिनेत्री स्मिता पाटील यांच्यावर राज बब्बर भलतेच फिदा होते. त्याच्या या प्रेम कहाणीची त्यावेळी बरीच चर्चा झाली होती. पण त्याचा अंत मात्र खूपच दुःखद झाला होता. स्मिता पाटील यांनी वयाच्या ३१ व्या वर्षीच या जगाला अलविदा केलं आणि दोघांची प्रेमकहाणी इथेच संपली.



आपल्या चित्रपट कारकिर्दीपेक्षा खासगी आयुष्य आणि वैवाहिक जीवनातील चढ- उतार यामुळे राज बब्बर जास्त चर्चेत राहिले. करिअरच्या अगदी सुरुवातीच्या काळात ते नादिरा जहीर यांच्या प्रेमात पडले होते. दोघंही नॅशनल स्कुल ऑफ ड्रामामध्ये शिक्षण घेत होते. १९७५ मध्ये त्यांनी लग्न केलं. लग्नानंतर दोघंही दिल्लीमध्येच राहत होते. नंतर त्यांची मुलगी जूहीच्या जन्म झाला आणि राज बब्बर यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या. त्यावेळी त्यांना अशा कामाची गरज होती जे त्यांना चांगला पैसा देऊ शकेल. त्यांनी आपलं अभिनय करिअर पुढे नेण्याचा विचार केला आणि मुंबईला आले. मात्र मुंबईत आल्यावर त्यांची करिअरच्या चांगला वेग घेतला पण त्यासोबतचं खासगी आयुष्यात मोठा ट्वीस्ट आला.

# अमरिश पुरी कोणत्या अभिनेत्याला म्हणाले 'गंदी नाली का किडा'?



आपल्या दमदार आवाज आणि भूमिकेसाठी ओळखल्या जाणाऱ्े कलाकार म्हणून अमरीश पुरी यांची ओळख आहे. केवळ भारतातच नाही तर जगभरामध्ये त्यांचे चाहते आहेत. बॉलीवूडमध्ये सर्वाधिक काळ चर्चेत असलेले व्हिलन म्हणून अमरीश पुरी यांचे नाव नेहमीच घेतले जाते. आज त्यांची बर्थ ॲनिव्हर्सरी आहे. त्यानिमित्तानं बॉलीवूडमध्ये त्यांच्याविषयीच्या काही आठवणींना आपण उजाळा देणार आहेत. अमरीश पुरी (AMRISH PURI) आणि बॉलीवूडमधील एक प्रसिद्ध अभिनेत्यासोबत मोठे वाद झाले होते. तो वाद एवढा टोकाला गेला होता की, त्यांनी त्या अभिनेत्याला अर्वाच्य शब्दांत ठणकावून सांगितले होते. आज तो अभिनेता बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे.गोविंदा भलेही मोठा अभिनेता असेल मात्र तो सेटवर वेळेचे पालन करताना अनेकदा चुकत असल्याचे दिसून आले होते. याविषयी त्याच्या अनेक सहकाऱ्यांनी मुलाखतीतून त्याच्याबाबत ही तक्रार केली होती. गोविंदाचे कित्येक कलाकारांसोबत त्यावरुन वादही झाले होते. यात ज्येष्ठ आणि प्रसिद्ध अभिनेते अमरीश पुरी यांच्या नावाचाही समावेश आहे. त्यांच्यात सेटवर फक्त हाणामारी व्हायची बाकी राहिली होती. ती भांडणं गोविंदाच्या करिअरला मोठं वळण देणारी ठरली. अमरीश पुरी यानंतर गोविंदासोबत काम न करणचं पसंद केलं. ज्या चित्रपटांमध्ये लीड भूमिकेत आहे त्याच चित्रपटांसोबत इतर चित्रपटांत दुय्यम भूमिका साकारताना देखील गोविंदानं वेळेचे पालन केले नसल्याचे सांगितले जाते.

# 'पुष्पा २' लवकरच.. पण श्रीवल्लीचं काय? निर्माते म्हणाले..

काही महिन्यांपूर्वीच प्रदर्शित झालेल्या 'पुष्पा' या चित्रपटाने प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावलं. हे वेड अजूनही कमी झालेलं नाही. प्रेक्षक अजूनही पुष्पा चित्रपटाची गाणी आणि संवाद यामध्ये अडकून आहेत. इतक्या जबरदस्त चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरही धुमाकूळ घातला. या चित्रपटाचा दुसरा कधी येणार याबाबत प्रेक्षक भलतेच उत्सुक आहे. विशेष म्हणजे 'पुष्पा २' या चित्रपटात 'श्रीवल्ली' या पात्राचा मृत्यू होणार असल्याची जोरदार चर्चा चाहत्यांमध्ये आहे. ही भूमिका रश्मिका मंदनानं केली होती. त्यामुळे तिचे चाहते या बातमीने नाराज झाले होते. अखेर चित्रपटाचे निर्माते वाय रवी शंकर यांनीच याबाबत मोठा खुलासा केला आहे.

'पुष्पा' चित्रपटामध्ये अभिनेता अल्लू अर्जुननं आणि अभिनेत्री रश्मिका मंदना प्रमुख भूमिकेत होते. सध्या जिथे तिथे 'पुष्पा २' ची चर्चा आहे. त्यातही श्रीवल्लीचं काय याबाबत मोठं प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.



# ऑन स्क्रीन : 'बँड एड' : वैवाहिक जीवनातील समस्यांवरील सांगीतिक मलमपट्टी

मध्यवर्ती पात्रांच्या वैवाहिक जीवनातील समस्या, घटस्फोटाची टांगती तलवार, त्याला लागून येणारी न्यायालयातील दृश्यं म्हटलं, की तुमच्या डोळ्यांसमोर कुठलं चित्र उभं राहतं? चित्रपटांचे संदर्भ द्यायचे झाल्यास 'क्रेमर व्हर्सेस क्रेमर' (१९७९), 'अ सेपरेशन' (२०११), 'मॅरेज स्टोरी' (२०१९), इ. बऱ्यापैकी गंभीर आशय व मांडणी असलेले चित्रपट आठवण्याची शक्यता अधिक आहे; पण अशा गंभीर संकल्पना घेऊन एक मजेशीर सांगीतिका बनवली जाऊ शकते, असा विचार तुम्ही केला आहे का?




आज आपण ज्या चित्रपटाविषयी बोलणार आहोत, तो चित्रपट अशाच प्रकारचा आहे. ॲना (झोई लिस्टर-जोन्स) आणि बेन (ॲडम पॉली) हे एक अमेरिकन जोडपं आहे. दोघंही वयाच्या तिशीत आहेत आणि त्यांची एकेकाळची स्वप्नं एव्हाना धुळीस मिळाली आहेत. दोघांचंही व्यावसायिक जीवन खूप मोठं अपयश ठरलं आहे. लेखिका असलेली ॲना चित्रपट सुरू होतो, तेव्हा उबर ड्रायव्हर म्हणून काम करत असते, तर व्हिज्युअल आर्टिस्ट असलेला बेन घरून काम करण्याचं सोंग घेत रिकामटेकडा बसलेला असतो. त्यांच्या वैवाहिक जीवनाचीही अशीच परिस्थिती असते. अशात हे दोघंही कलात्मक प्रेरणांच्या शोधात असतात. मात्र, दोघांचा बहुतांशी वेळ एकमेकांना शिव्या घालण्यात व भांडण्यात जात असतो. त्यांच्या भूतकाळातील चुका त्यांच्या मानगुटीवर स्वार होऊन त्यांच्या वर्तमानातील सुखात व्यत्यय आणत असतात.

# दिल, दोस्ती : जुळलेले सूर

संगीत क्षेत्रात नावीन्याचा ध्यास घेत सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या बऱ्याच संगीतकारांनी मनोरंजन विश्वात नाव कमावलं आहे. या यादीत सध्या आघाडीवर असलेली संगीतकार जोडी म्हणजे अविनाश-विश्वजित. 'कधी तू...', 'ओल्या सांज वेळी...', 'हृदयात वाजे समथिंग...' अशी अनेक सुपरहिट गाणी त्यांनी दिली. तसेच नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'धर्मवीर' या चित्रपटातील त्यांनी केलेल्या गाण्यांचेही कौतुक होत आहे. इसवीसन २००२ पासून ते एकमेकांचे मित्र आहेत. त्यांचा म्युझिकल बॉंड जुळला व यांनी एकत्रितपणे काम करायला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात पार्श्वसंगीत देण्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर २०१० मध्ये प्रदर्शित झालेल्या सुपरहिट 'मुंबई-पुणे-मुंबई' या चित्रपटाद्वारे अविनाश-विश्वजित यांनी संगीत दिग्दर्शक म्हणून काम सुरू केलं.

विश्वजित म्हणाला, 'अविनाशचा स्वभाव हा शांत आणि मृदू आहे. कलाकार म्हणून तो उत्कृष्ट आहेच, एक माणूस म्हणून उत्तम



म्हणण्यासाठी लागणाऱ्या सगळ्या गुणवत्ता त्याच्याकडे आहेत. अविनाश मला माणूस म्हणून पटतो, भावतो. आम्ही माणूस म्हणून आधी एकमेकांशी जोडले गेलेलो असल्यानं इतकी वर्षं आम्ही एकत्र काम करत आहोत. कामाच्या बाबतीत किंवा वैयक्तिक बाबतीत तो प्रत्येक गोष्ट फार शिस्तीनं करतो.

## शॉर्ट न्यूज »

### कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्या स्थानावर असलेला खेळाडू म्हणतो, ‘मला क्रिकेट आवडत नाही…!’

नवीदिल्ली ।महाईन्यूज

न्यूझीलंडचा संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. यजमान आणि न्यूझीलंड दरम्यान तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना आजपासून लीड्समधील हेडिंग्ले येथे खेळवला जाणार आहे. आतापर्यंत ही कसोटी मालिका इंग्लंडच्या फलंदाजांनी गाजवली आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. आपल्या धमाकेदार फलंदाजीच्या जोरावर तो कसोटी क्रिकेटमधील पहिल्या क्रमांकाचा फलंदाज ठरला आहे. दरम्यान, आता जो रूटचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

बुधवारी जो रूटने आपल्या अधिकृत ट्विटर हॅंडलवर एक फोटो शेअर केला आहे. ज्यामध्ये तो एका फलकाजवळ उभा आहे. त्या फलकाजवळ बॅटही उभी केलेली आहे. रूट ज्या फलकाजवळ उभा आहे त्यावर

# भारतीय मुलींची विजयी सुरुवात

## पहिल्या टी20 सामन्यात श्रीलंकेचा 34 धावांनी केला पराभव

।नवीदिल्ली । महाईन्यूज ।

भारतीय महिला क्रिकेट संघांची कर्णधार मिताली राजने काही दिवसांपूर्वी सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. तिच्या निवृत्तीनंतर भारतीय महिला संघ पहिल्याच आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी श्रीलंकेला गेला आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली भारतीय मुलींनी आपल्या श्रीलंका मोहिमेची विजयी सुरुवात केली आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाने पहिल्या टी २० सामन्यात यजमान श्रीलंकेचा ३४ धावांनी पराभव केला. या विजयासह तीन टी २० सामन्यांच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेतली आहे. शेफाली वर्माने अष्टपैलू कामगिरी करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.



भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली होती. मात्र, श्रीलंकेच्या शिस्तबद्ध गोलंदाजीपुढे भारताला जास्त धावा करता आल्या नाहीत. डावाच्या तिसऱ्या षटकात सलामीवीर स्मृती मानधना अवघी एक धाव करून बाद झाली. तिच्या पाठोपाठ मेघनादेखील लवकर बाद झाली. उष्ण आणि दमट वातावरणात सुरुवातीलाच दोन विकेट्स गमावल्यानंतर भारतीय संघावर दबाव स्पष्टपणे दिसत होता. हरमनप्रीत आणि शेफाली वर्मा या जोडीने ही नाजूक परिस्थिती हाताळली. शेफालीने ३१ धावांची खेळी केली.

संघात पुनरागमन करणाऱ्या जेमिमा रॉड्रिग्जने भारताला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेण्याची जबाबदारी पार पाडली. पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या जेमिमाने तीन चौकार आणि एका षटकारासह ३६ धावा केल्या. निर्धारित २० षटकांमध्ये भारताने सहा बाद १३८ धावा केल्या होत्या.प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ २० षटकांत पाच गडी गमावून १०४ धावांपर्यंत मजल मारू शकला. भारतीय गोलंदाजांनी ठराविक अंतराने श्रीलंकेचे बळी मिळवल्याने त्यांना लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करता आला नाही. शेफाली वर्माने दोन षटकांत १० धावा देऊन दोन बळी घेतले. तर, राधा यादवने दोन आणि पूजा वस्त्रारकर व दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. ३६ धावांची खेळी करणाऱ्या जेमिमा रॉड्रिग्जला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

# …म्हणून आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस साजरा केला



।नवीदिल्ली । महाईन्यूज ।

मानवी जीवनात खेळांना अनन्य साधारण महत्त्व आहे. मनोरंजन आणि शारीरिक तंदुरुस्तीसाठी जगभरात विविध प्रकारचे खेळ खेळले जातात. या विविध खेळांना आणि खेळाडूंना एकाच छताखाली आणण्यासाठी दर चार वर्षांतून एकदा खेळांच्या कुंभमेळ्याचे अर्थात ऑलिंपिक स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धेत जगभरातील हजारो खेळाडू सहभागी होतात. खेळांचे महत्त्व दिवसेंदिवस आणखी वाढत जावो यासाठी दरवर्षी २३ जून रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस साजरा केला जातो. त्यानुसार, आज जगभरात आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस साजरा होत आहे.आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस साजरा करण्यासाठी दरवर्षी एक वेगळी थीम निश्चित केली जाते. या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवसासाठी, ‘एकत्र, शांत जगासाठी’ (TOGETHER, FOR A PEACEFUL WORLD) अशी थीम ठेवण्यात आली आहे. लोकांना शांततेत एकत्र आणण्याची ताकद खेळामध्ये असते. युक्रेन-रशियन युद्धाच्या पार्श्वभूमीवर ही थीम निश्चित करण्यात आली आहे. वय, लिंग, वंश किंवा धर्म यांची पर्वा न करता जगभरातील खेळ आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी जगभरात ठिकठिकाणी ऑलिंपिक खेळांविषयी प्रदर्शने आणि शैक्षणिक चर्चासत्रेही आयोजित केली जातात.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही